BHARATI INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY

RESEARCH & DEVELOPMENT (BIJMRD)

(Open Access Peer-Reviewed International Journal)

DOI Link : https://doi.org/10.70798/Bijmrd/04041017

Available Online: www.bijmrd.com | BIJMRD Volume: 4 | Issue: 04(1) | April 2026 | e-ISSN: 2584-1890

# मराठी भाषा व रोजगार संधी

**प्रा. प्रदिप केशव चापले**

सहाय्यक प्राध्यापक, वनश्री कला व विज्ञान महाविद्यालय कोरची, जिल्हा गडचिरोली
Email: pradeepchapale@gmail.com

**सारांश:**

*मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून व्यक्तीच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावते. जागतिकीकरणामुळे बहुभाषिक कौशल्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, अनेक भाषा जाणणाऱ्या व्यक्तींना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतात. मराठीसह इतर भाषांचे ज्ञान व्यक्तीला स्पर्धात्मक बनवते. औपचारिक आणि अनौपचारिक भाषा शिक्षणामुळे संवादकौशल्य वाढते आणि रोजगाराच्या संधी विस्तारतात.*

*मराठी भाषा जाणणाऱ्या युवकांसाठी सरकारी व प्रशासकीय सेवा, पत्रकारिता, आकाशवाणी व दूरदर्शन, नाटक व चित्रपट निर्मिती, जाहिरात, लेखन व प्रकाशन, भाषांतर, पर्यटन, सूत्रसंचालन, शिक्षण आणि डिजिटल माध्यमे अशा विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. मात्र, या संधींचा लाभ घेण्यासाठी केवळ भाषेचे ज्ञान पुरेसे नसून लेखनकौशल्य, सर्जनशीलता, व्याकरणाची जाण आणि तांत्रिक कौशल्ये आवश्यक आहेत. मराठी भाषेचा प्रभावी आणि व्यावहारिक वापर केल्यास ती रोजगारनिर्मितीचे प्रभावी साधन ठरू शकते. त्यामुळे मराठीचा अभ्यास हा केवळ शैक्षणिक न राहता व्यावसायिक दृष्टीनेही महत्त्वाचा आहे.*

**बीज शब्द:** *मराठी भाषा, रोजगार संधी, बहुभाषिकता, व्यावहारिक कौशल्य, भाषा शिक्षण*

उच्च शिक्षणात भाषेच्या अध्ययन आणि अध्यापनाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. जागतिकीकरणामुळे जगातील विविध भाषिकांचा संपर्क अतिशय झपाट्याने वाढला आहे. त्यामुळे भाषा शिक्षण हे जागतिकीकरणाच्या युगात अतिशय महत्वपूर्ण ठरत आहे. भाषा ही केवळ संवादाचे साधन नाही, तर ती व्यक्तीच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे. आजच्या बहुभाषिक जगात, भाषिक शिक्षणाने व्यक्तींला जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक बनवते. यूनेस्कोच्या अहवालानुसार, जगात ७,००० हून अधिक भाषा बोलल्या जातात, परंतु केवळ २३ भाषा जगातील ६० टक्के लोकसंख्येचे व्यवहार पार पडतात. त्यामुळे रोजगारासाठी व्यक्तीची बहुभाषिकता ही रोजगाराच्या विविध संधी निर्माण करते. त्यामुळेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये त्रिभाषा सूत्र (मातृभाषा, हिंदी आणि इंग्रजी) स्वीकारले गेले आहे. भारतासारख्या बहुभाषिक देशात हिंदी, इंग्रजी, मराठीसह स्थानिक भाषा शिकणे हे केवळ शैक्षणिकच नव्हे तर व्यावसायिक दृष्ट्या देखील गरजेचे आहे. ब्रिटिश कौन्सिलच्या २०२० च्या अभ्यासानुसार, बहुभाषिक व्यक्तींना एकलभाषिकांपेक्षा ३५ टक्के अधिक वेतन मिळते. या पार्श्वभूमीवर, भाषिक शिक्षण आणि रोजगाराच्या विविध संधी यांच्यातील संबंध लक्षात घेणे अतिशय आवश्यक आहे. म्हणून या निबंधात सुरुवातीला भाषा व रोजगार यांच्यातील सबंध स्पष्ट करून नंतर मराठी भाषा व रोजगाराच्या विविध संधी यांचा आढावा येथे घेतला जाणार आहे.

**भाषा शिक्षण व रोजगार यांच्यातील संबंध**

भाषा शिक्षण प्रामुख्याने दोन प्रकारात विभागता येईल. एक औपचारिक आणि दुसरे अनौपचारिक भाषा शिक्षण. औपचारिक भाषा शिक्षणात शाळा महाविद्यालय स्तरावर शिकविले जाणारे भाषिक अभ्यासक्रम यांचा समावेश करता येईल. तर अनौपचारिक शिक्षणात ऑनलाइन कोर्सेस, ॲप्स आणि भाषा संस्था यांचा समावेश करता येईल. ग्रीनहाऊस २०२३ च्या सर्वेक्षणानुसार, ४० टक्के तरुण हे ऑनलाइन भाषा शिकतात. यामुळे व्यक्तींची संवादक्षमता वाढते, जी रोजगारासाठी आधारभूत आहे. विविध भाषा व विविध भाषिक कौशल्ये आत्मसात केल्याने रोजगाराच्या संधींमध्ये वाढ होत असल्याचे जाणवते. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या २०२३ च्या 'फ्युचर ऑफ जॉब्स' अहवालानुसार, ८५ टक्के नोकऱ्या ह्या बहुभाषिक कौशल्यांवर अवलंबून आहेत. त्यामुळे बहुभाषिक कौशल्ये आत्मसात करणाऱ्या उमेदवारांना रोजगाराच्या १५ ते २० टक्के संधी अधिक मिळतात. हॉर्वर्ड युनिव्हर्सिटीच्या २०२१ अभ्यासानुसार स्पेनमध्ये द्वितीय भाषा शिकणाऱ्यांचा बेरोजगारी दर १२ टक्के कमी होता. कॅनडामध्येही फ्रेंच-इंग्रजी बोलणाऱ्यांना सरकारी नोकऱ्यांमध्ये प्राधान्य दिले जाते. एनएसएसओ च्या ७५ व्या फेरीच्या माहितीनुसार इंग्रजी ही भाषा जाणणाऱ्या तरुणांचा रोजगार दर हा ४० टक्के जास्त होता. मात्र मराठी आणि इंग्रजी अशा दुहेरी भाषा जाणणाऱ्या तरुणांना स्थानिक उद्योगांमध्ये फायदा मिळाल्याचे अहवालात नमूद केले आहे.

**मराठी भाषा व वर्तमान**

मराठी ही भारतातील समृद्ध भाषांपैकी एक आहे, जी १४ कोटीपेक्षा अधिक लोक बोलतात. संविधानाच्या आठव्या परिशिष्टात समाविष्ट असलेली ही भाषा केवळ सांस्कृतिक वारसा नाही, तर ती रोजगाराच्या विविध संधींचे साधनही आहे. मराठी भाषा अभ्यासामुळे स्थानिक आणि राष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होत आहेत. महाराष्ट्र राज्य भाषा विभागाच्या २०२४ च्या अहवालानुसार मराठी माध्यम शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या ४० लाखांहून अधिक आहे परंतु त्यांचा रोजगार दर इंग्रजी माध्यमाच्या तुलनेत १५ टक्याने कमी आहे. मात्र यामागील कारणांचा शोध घेऊन भाषेच्या पारंपरिक अभ्यासक्रमाला फाटा देऊन अभ्यासक्रमात 'व्यावहारिक मराठीचा' समावेश केल्याने मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांनाही रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होत आहेत. म. ई. तंगावार हे 'मराठी भाषा व साहित्य क्षेत्रातील रोजगाराच्या संधी' या आपल्या लेखात मराठी भाषाभ्यास करणाऱ्या तरुणांसाठी उपलब्ध असलेल्या विविध संधी स्पष्ट करून तिथे कौशल्ययुक्त उमेदवारांची कशी उणीव जाणवते हे स्पष्ट करतांना म्हणतात की, "तिथे भाषेवर, लेखनावर प्रभुत्व असणारे, प्रयत्न करणारे तसेच कौशल्ययुक्त विद्यार्थी मिळत नाहीत. त्यांना टाईपसाठी, बातम्या सांगण्यासाठी मुलगा-मुलगी पाहिजे अशा जाहिराती द्याव्या लागतात." याचाच अर्थ मराठी भाषेचा अभ्यास करणाऱ्या तरुणांना रोजगाराच्या विविध संधी प्राप्त होऊ शकतात मात्र त्यासाठी विविध व्यवहार क्षेत्रांसाठी आवश्यक असलेली भाषिक कौशल्ये त्यांनी उत्तम रीतीने आत्मसात करणे आवश्यक आहे.

**मराठी भाषाभ्यासकांसाठी विविध क्षेत्रात असलेल्या रोजगाराच्या संधी**

मराठी भाषेची उत्तम जाण बाळगणाऱ्या तरुणांना खालील क्षेत्रात रोजगाराच्या संधी आहेत.

**सरकारी आणि प्रशासकीय सेवा**

केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड मंडळ, आयबीपीएस, टीसीएस इत्यादी मार्फत घेण्यात येणाऱ्या वर्ग १ ते ३ च्या संवर्गातील विविध पदांसाठी मराठी हा विषय अनिवार्य करण्यात आलेला असल्याने मराठी भाषा आणि साहित्याची उत्तम जाण असलेल्या तरुणांना या क्षेत्रात विविध संधी उपलब्ध आहेत.

**सरकारी प्रशासन**

महाराष्ट्र शासनाने सर्व कार्यालयीन कामकाज मराठीतून करणे अनिवार्य केलेले असल्यामुळे शासकीय कार्यालये, मंत्रालयातील विभाग, सचिवालय, शासकीय मुद्रणालय अशा अनेक ठिकाणी मराठी भाषेची उत्तम जाण असलेल्या व मराठी टंकलेखन, मुद्रितशोधन जाणणाऱ्या युवकांना रोजगारांच्या संधी उपलब्ध आहेत.

**पत्रकारिता**

महाराष्ट्रात पत्रकारितेचे व्यवसायक्षेत्र व्यापक आहे. वाचकांना रोजच्या दैनंदिन बातम्या पुविण्यासाठी विविध वृत्तपत्राना बातमीदारांची, ग्रामीण प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी यांची गरज असते. यासोबतच अग्रलेख, स्तंभलेखन, चित्रपट व नाट्यसमीक्षण, क्रीडा वृत्तांकन अशा अनेक प्रकारातील लेखन करणाऱ्या लेखकांची वृत्तपत्रांना गरज असते. या सर्व प्रकारांच्या लेखनाचे मर्म ओळखून कौशल्यपूर्ण लेखन करणाऱ्यांना या क्षेत्रात उत्तम संधी असते. यासोबतच भाषेच्या व्याकरण व प्रमाणलेखनाची जाण असणाऱ्यांना संपादक, मुद्रितशोधक म्हणूनही रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

**आकाशवाणी, दूरदर्शन, नाटक व चित्रपट निर्मिती**

ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागात आजही आकाशवाणी व दूरदर्शनला महत्वाचे स्थान आहे. आकाशवाणी व दूरदर्शन या दोन्ही माध्यमांचे स्वरूप भिन्न असले तरी या दोन्ही ठिकाणी बातमी लेखक, वृत्तनिवेदक, निवेदक, प्रकट वाचक, मुलाखतकार, नभोनाट्यलेखक, संवादलेखक, जाहिरात दिग्दर्शक अशी अनेक कार्य करण्यासाठी मनुष्यबळाची गरज असते. दूरदर्शन आणि आकाशवाणी या दोन्ही माध्यमातील फरक लक्षात घेऊन कौशल्यपूर्ण लेखन करणाऱ्यांना या क्षेत्रात उत्तम संधी आहे. यासोबतच नाटक व चित्रपटांसाठी कथालेखन, पटकथा लेखन, संवादलेखन, नाट्यलेखन, नेपथ्यकार, प्रयोगव्यवस्थापक, माहितीपट व अनुबोधपटांची निर्मिती, दिग्दर्शन अशी अनेक कार्य करण्यासाठी युवकांना संधी आहे.

**जाहिरात**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात जाहिरातींना अनन्यसाधारण महत्व आहे. एखाद्या कंपनीचे उत्पादन लोकांच्या स्मरणात कायमस्वरूपी कोरण्यासाठी मोजक्या शब्दांत व आकर्षक पद्धतीने जाहिरात तयार करण्याचे कौशल्य असावे लागते. वेधकता, आकर्षकता, समर्पकता अशा वैशिष्ट्यांनी युक्त असलेली जाहिरात वाचक प्रेक्षकांच्या मनाचा चटकन ताबा घेते. यासाठी जाहिरात लेखकाकडे उत्तम कल्पनाशक्ती व प्रतिभा असावी लागते. जाहिरात लेखक, जाहिरात डिझायनर, जाहिरात संकलक, जाहिरात संयोजक म्हणून काम करण्याच्या अनेक संधी आजच्या युवकांकडे आहेत. विविध कंपन्यांच्या उत्पादनांची माहितीपत्रके तयार करणे, संस्थांच्या निर्णयांची जाहीर निवेदने प्रसिध्द करणे यासाठी उत्तम भाषिक कौशल्य असणाऱ्याची या क्षेत्राला खूप गरज आहे.

**लेखन व प्रकाशन**

कथा, कादंबरी, कविता, ललित निबंध व इतर अनेक प्रकारच्या विविधांगी साहित्याचे खूप मोठे क्षेत्र मराठीत आहे. उत्तम प्रतिभा शक्ती, कल्पनाशक्ती व लेखनतंत्र आत्मसात करून यामध्ये स्वताचे करिअर घडविण्याची युवकांना संधी असते. याशिवाय नियतकालिके, विविध संस्थांच्या स्मरणिका, दिवाळी अंक, स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त ठरतील अशी पुस्तके व ग्रंथ यांचे लेखन, संपादन, प्रकाशन व वितरण करण्यासाठी अनेक संधी उपलब्ध असतात.

**भाषांतर**

भारत हा बहुभाषिक देश आहे. भारतात आंतरराष्ट्रीय व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजी, देशपातळीवरील व्यवहार भाषा म्हणून हिंदी व राज्याच्या पातळीवर त्या त्या राज्यांच्या राज्यभाषेतून प्रामुख्याने व्यवहार पार पडत असतात. त्यामुळे सचिवालय, उच्च व सर्वोच्च न्यायालय, भाषा संचालनालय, कृषी आयुक्तालय यासारख्या शासकीय सेवांमध्ये भाषांतराची गरज असते. यासोबतच साहित्याच्या भाषांतराचे देखील खूप मोठे क्षेत्र उपलब्ध आहे. स्थानिक भाषेतील साहित्याचे इतर भारतीय भाषा व परकीय भाषांमध्ये अनुवाद करणे व इतर भाषांमधील उत्तम दर्जाच्या साहित्याचे स्थानिक भाषेत अनुवाद करण्यासाठी देखील युवकांना संधी आहेत. मात्र त्यासाठी बहुभाषिक कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. विविध कंपन्यांचे माहितीपत्रक, पोष्टर्स स्थानिक भाषांमध्ये अनुवादित करणे, जाहिरातींचे अनुवाद करणे असे अनेक क्षेत्र यामध्ये आहेत.

हल्लीच्या युगात पर्यटनाचे क्षेत्र अतिशय व्यापक झालेले आहे. दळणवळणाची साधने अतिशय सोयीची झाल्याने विविध देशातील लोक पर्यटनासाठी ये-जा करीत असतात. मात्र प्रत्येक प्रवाशाला स्थानिक भाषा बोलता येतेच असे नाही. त्यामुळे

अशा प्रसंगी परदेशी व स्थानिक अशा दोन्ही भाषांची सखोल जाण असलेल्या तरुणांना दुभाषक म्हणून काम करण्याची उत्तम संधी असते. विविध देशांचे सरकारी अधिकारी आणि राजकीय नेते जेव्हा परदेश दौऱ्यावर येतात तेव्हा त्यांनाही दुभाषकांची गरज पडत असते. त्यामुळे हे क्षेत्र सुद्धा एक रोजगाराची उत्तम संधी युवकांना प्रदान करते.

**व्यावसायिक सेवा क्षेत्र**

मराठी भाषा आणि साहित्याचे उत्तम ज्ञान असेल तर व्यावसायिकदृष्ट्याही अनेक क्षेत्र उपलब्ध आहेत. सूत्रसंचालन किंवा निवेदन हे असेच एक क्षेत्र होय. सूत्र संचालन कसे करावे? त्याच्या पायऱ्या, उत्तम वक्तृत्व कौशल्य, भरदार आवाज, भाषाप्रभुत्व असे काही कौशल्य विकसित केले तर युवकांना यामध्ये देखील स्वत:चे उत्तम करिअर घडवता येऊ शकते. विविध संस्थांनी आयोजित केलेले कार्यक्रम, कवी संमेलने, सेवानिवृत्ती, सत्कार समारंभ, बक्षीस वितरण, विविध सामाजिक मेळावे अशा अनेक ठिकाणी उत्तम निवेदन अथवा सूत्रसंचालन करणारांची आयोजकांना गरज असते. उत्तम निवेदकाला भरघोस मानधनही यासाठी दिले जाते.

अनेक महत्त्वाच्या प्रसंगी व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या जात असतात. त्यासाठी देखील मुलाखत कशी घ्यावी याची जाण असलेल्या, मुलाखत तंत्राची ओळख असलेल्या व्यक्तींची गरज असते. आज आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके या सर्वांनाच अशा व्यक्तींची गरज असते. हे क्षेत्र सुद्धा व्यावसायिक दृष्ट्या युवकांना निवडता येऊ शकते.

**इन्टरनेट व इलेक्ट्रानिक माध्यमे**

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. आज प्रत्यक्ष छापील पुस्तके, वर्तमानपत्रे वाचण्यापेक्षा लोक डिजिटल स्वरुपात उपलब्ध होणारे साहित्य जास्त वाचत असल्याचे दिसते. याचे एक कारण म्हणजे आपणाला वेळेवर जे हवे ते आणि जिथे हवे तिथे इन्टरनेटमुळे अगदी सहज उपलब्ध होते. आता तर आर्टीफिशियल इंटेलिजन्स व्यक्तीच्या आवडी निवडी लक्षात घेऊन तुम्हाला आवडणाऱ्या बातम्या आणि इतर अनेक घटकांच्या जाहिराती स्वताहून निवडून देते. त्यामुळे मराठी भाषेची उत्तम जाण असणाऱ्या युवकांना इन्टरनेट आणि वेबसाईट, विविध ॲप्स यांच्या माध्यमातून ब्लॉग लेखक, बातमीदार, संपादक, विकिपीडिया लेखक, ग्राफिक्स डिझायनिंग, युट्यूब वरील वृत्तवाहिन्या अशा अनेक प्रकारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. मात्र या प्रत्येक क्षेत्रात वाचक व प्रेक्षकांची गरज लक्षात घेऊन त्या त्या पद्धतीने साहित्य निर्मिती करता येणे आवश्यक आहे.

**शिक्षण**

मराठीचा उत्तम अभ्यास असलेल्या युवकांना शिक्षण क्षेत्रात प्रवेश मिळविण्याची देखील मोठी संधी असते. महाराष्ट्रात शालेय शिक्षणात मराठी ही भाषा मातृभाषा म्हणून अनिवार्य केलेली असल्यामुळे मराठीच्या शिक्षकांची खूप मोठी मागणी शिक्षण क्षेत्रात असते. विविध महाविद्यालयामध्ये मराठीच्या प्राध्यापकांची मागणी असते. मात्र त्यासाठी मराठी भाषा व साहित्याची, मराठी व्याकरण व भाषाशास्त्र यांची उत्तम जाण असणे अतिशय आवश्यक ठरते. शिक्षण क्षेत्र ऑनलाईन अभ्यासवर्ग घेऊन देखील अनेक युवक आपला रोजगार चालवतांना दिसतात. विविध स्पर्धा परीक्षामध्ये मराठी व्याकरण महत्वाचे असल्याने त्याचे ऑनलाईन अभ्यासवर्ग देखील मोठ्या प्रमाणात घेतले जातांना दिसतात. ही सुद्धा शिक्षण क्षेत्रातील एक महत्वाची रोजगार संधी ठरू शकते.

**निष्कर्ष**

मराठी भाषा अभ्यास हे रोजगाराच्या विविध संधी प्रदान करणारे महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणापासून डिजिटल क्षेत्रापर्यंत यात भरपूर संधी आहेत मराठीचा कौशल्याने वापर करता आल्यास त्या माध्यमातून रोजगार उपलब्ध होऊ शकतो. आव्हाने सोडवल्यास मराठी भाषाभ्यास ही एक महत्त्वाची आर्थिक शक्ती बनेल. यासाठी प्रत्येकाने मराठी अभ्यास सुरू करावा, कारण ती भविष्याची गुंतवणूक आहे.

**संदर्भ :**


- नसिराबादकर डॉ. ल. रा., 'व्यावहारिक मराठी', फडके प्रकाशन कोल्हापूर, नववी आवृत्ती.
- तंगावार म. ई. हे' मराठी भाषा व साहित्य क्षेत्रातील रोजगाराच्या संधी 'ऑनलाईन लेख.
- महाराष्ट्र राज्य भाषा विभाग. (२०२४). मराठी भाषा अहवाल.
- एनएसएसओ. (२०२४). ७८व्या फेरी सर्वेक्षण.
- ASER सेंटर. (२०२४). Annual Status of Education Report.
- मराठी भाषा संभाषण केंद्र. (२०२३). डिजिटल मराठी अभ्यास.
- पीयू रिसर्च सेंटर. (२०२४). Indian Media Landscape.
- यूनेस्को. (२०२२). Atlas of Endangered Languages.



**Citation: चापले. प्रा. प्र. के.,** (2026) "मराठी भाषा व रोजगार संधी", *Bharati International Journal of Multidisciplinary Research & Development (BIJMRD)*, Vol-4, Issue-04(1), April-2026.